साप्ताहिक चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

• वर्ष : १८
• अंक : ८
• पाने : ८
पुणे

मूल्य ६/-


www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner

■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants

For More Details Contact

INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.



Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.

WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111.
Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.

Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. ६ ते १२ एप्रिल २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | RNI No. MAHMAR/2011/35979

# भलेपणाचे भाग्य नासले!

**एकनाथ शिंदे यांच्या काळात महायुती सरकारची ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ सुरू झाली आणि हे सरकार तरले! शिंदेंच्या मार्गदर्शनाखाली मंगेश चिवटे यांच्या नेतृत्वात सुरू असलेला ‘मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष’ आणि ‘लाडकी बहीण योजना’ यांचा हे सरकार येण्यात मोठा वाटा आहे! मात्र आता गेल्या वीस महिन्यांत या योजनेचा लाभ घेत असलेल्या ७१ लाख बहीणी अपात्र ठरल्या असून सरकारने त्यांच्यासाठी तब्बल २१ हजार ३०० कोटी रूपये खर्च केले आहेत. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून कोणतीही पडताळणी न करता या योजनेचा लाभ अनेकींना देण्यात आला होता. सरकारने त्यांच्या यशाचा विचार करत हे पैसे उधळले असले तरी ज्या ७१ लाख बहीणींनी त्यांची योग्यता नसताना म्हणजे या योजनेच्या निकषात बसत नसतानाही जो लाभ घेतला त्या मानसिकतेला काय म्हणावे? सरकारी योजनांवर टीका करत असतानाच या महिलांचा हा भ्रष्टपणा हेच आजच्या लोकशाहीचे वास्तव आहे. ‘यथा राजा तथा प्रजा’ असे म्हटले जाते मात्र आजच्या काळात ‘यथा प्रजा तथा राजा’ असे म्हटल्यास वावगे ठरू नये.**

लोकांचे आचरण, त्याचे गुण आणि नीतीमत्ता याचा प्रभाव सरकारवर पडण्याचे हे दिवस आहेत. राजकारणी लोक कोटीच्या कोटी उड्डाणे घेतात हे तर खरेच! पण त्यांच्यावर आपण काही बोलावे अशी परिस्थिती आहे का? झोपडपट्टी भागात एखादी साडी किंवा पुरूषांना दारूची बाटली दिली की काम भागते पण शहरी भागातील सोसायट्यांचा विचार केला तर ते तरी मतदान कर्तव्यभावनेतून करतात का? आमच्या सोसायटीला रंग लावून द्या, पार्किंगची सोय करून द्या, मुलांसाठी बाग आणि ट्रॅक करून द्या या व अशा मागण्या करत उमेदवारांकडून लाभ वसूल करणारे अनेक जण बाजूबाजूला दिसतात. राज्यकर्त्यांविषयीची उदासीनता आणि कुणालाही मतदान केले तरी लोकशाहीचे हे भडवे निकालानंतर गरजेनुसार एकत्र येतात, अभद्र युत्या-आघाड्या करतात हे माहीत असल्याने मतदानाचे प्रमाण घटत चालले आहे. सरासरी पन्नास-पंचावन्न टक्के मतदान झाले तरी त्यात चार-सहा पक्ष आणि त्याहून जास्त अपक्ष असल्याने मतदानाचे विभाजन होते. त्यातून ज्या उमेदवाराला पाच-सात टक्के मतदान मिळते तो लोकशाहीचा राजा ठरतो आणि प्रजेला आपली बटीक समजतो. मग त्यांच्यावर अंकुष ठेवणे कुणाला आणि कसे शक्य होणार? ज्या ७१ लाख महिलांनी या योजनेचा पात्रता नसताना लाभ घेतला त्यांच्या मतदानावर हे सरकार आलेले असल्याने सरकारही ‘अपात्र’ आहे, असे म्हटल्यास ती मुळीच अतिशयोक्ती ठरणार नाही.



संपादकीय
घनश्याम पाटील
७०५७२९२०९२

मध्यप्रदेश सरकारने २०२३ ला ‘लाडली बहना’ ही योजना सुरू केली होती. एकनाथ शिंदे यांनी मध्यप्रदेश सरकारचे अनुकरण करत त्यांच्या पक्षाला आणि त्यांच्या मित्रपक्षाला घवघवीत यश मिळवून दिले. ही योजना महाराष्ट्रात सुरू झाली त्यावेळी निवडणुका तोंडावर होत्या. त्यामुळे लाभार्थींच्या अर्ज पडताळणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. काही ठिकाणी काही पुरूषांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे कळते. सरकारी कर्मचारी, ज्यांचे स्वतःचे घर आहे, ज्या आयकर भरतात, ज्यांच्याकडे चारचाकी गाडी आहे इतकेच काय तर काही परप्रांतिय महिलांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे सांगितले जात आहे. आता त्यांच्याकडून ही रक्कम परत कशी मिळवायची याची पडताळणी सुरू आहे. ही रक्कम परत मिळवताना त्यांना काही तरी शिक्षा होणेही आवश्यक आहे. इतकेच नाही तर या अर्ज पडताळणीत ज्या अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी हलगर्जीपणा केला त्यांच्यावरही योग्य ती कारवाई व्हावी. निवडणुकीत लाभ मिळेल या हेतूने इकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारनेही प्रायश्चित्त घेणे गरजेचे आहे. कुणा न कुणावर खापर फोडण्याऐवजी आपल्या बुडाखाली काय धगधगतंय आणि आपणच इकडे कानाडोळा केल्याने तिजोरीचा कसा खणखणाट झाला हे मान्य केले पाहिजे. करदात्यांच्या खिशातील हा पैसा आपल्या स्वार्थासाठी असा उधळणाऱ्या मायबाप सरकारला लाज वाटायला हवी. गेंड्यापेक्षा आपली कातडी मजबूत आहे, सरड्यापेक्षा कमी वेळात आपण रंग बदलू शकतो हे सातत्याने कृतितून सिद्ध करणाऱ्या सरकारने लोकानुनय करत आपणच कसे लोककल्याणकारी राज्य चालवतो आहोत याचा आव आणू नये.शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्यांना निधी देताना सरकारकडे पैसा नाही. टपाल खाते असेल, आकाशवाणी-दूरदर्शनसारखी माध्यमे असतील किंवा सार्वजनिक वाहतूक विभाग असेल... सर्वच सरकारी विभागात कर्मचाऱ्यांची भरती नाही. त्यांना पगार द्यायला नको म्हणून कामचलाऊ कंत्राटी माणसे बोलवून वेळ निभावली जाते. अशोक खरातसारख्या भोंदूंना खूश करण्यासाठी ते सदस्य असलेल्या देवस्थानांना कोट्यवधी रूपयांचे अनुदान दिले जाते. कुंभमेळ्यांसाठी पैशांचा पाऊस पाडला जातो. त्याउलट साहित्य संमेलनांकडे दुर्लक्ष केले जाते. मराठी शाळा बंद पडल्या तरी त्याचे कुणाला सोयरसुतक नसते. ग्रंथालयांचे अनुदानवाढ तर सोडाच त्यांच्या आहे त्या अनुदानालाही कातरी लावली जाते.



राज्य सरकारने २८ जून २०२४ ला लाडकी बहीण योजनेस मान्यता दिली होती. त्यासाठी अर्ज करायची शेवटची तारीख होती १५ जुलै २०२४. या योजनेचा गरजूंना लाभ घेता यावा म्हणून ‘नारीशक्ती दूत’ नावाचे मोबाईल ॲपही डेव्हलप करण्यात आले होते. महिलांनी ऑनलाईन अर्ज भरले आणि ते धडाधड मंजूर करण्यात आले. निवडणुका तोंडावर असल्याने फटाफट अर्ज भरून घ्या आणि त्यांच्या खात्यावर पैसे जमा करा, असेच धोरण होते. राजा हरिश्चंद्रानंतर महात्मा गांधी आणि महात्मा गांधीनंतर या योजनेच्या लाभासाठी अर्ज भरणाऱ्या बहीणीच सत्यवादी आहेत, असे तर सरकारला वाटले नसावे! पण जर त्यांना हे अनुदान दिले गेले तर महाआघाडीचा पराभव सहजशक्य होणार याचे ठोकताळे मात्र अचूक बांधले होते. आता ज्यांनी या योजनेचा गैरफायदा घेतला त्यांची नावे वगळून जे खरोखरी पात्र आहेत, त्यांना त्याचा लाभ मिळावा, असे सरकारचे धोरण आहे. ते योग्यच असले तरी आजवर जी बेपर्वाई झाली ती सुधारणे गरजेचे आहे.

‘जगाच्या पाठीवर’ या चित्रपटातील गदिमांचे अजरामर गाणे आज पुन्हा पुन्हा आठवत आहे. काळ बदलला तरी त्यातील भाव किती अचूक आहे हे वाचकांच्या लक्षात येईलच.

**लबाड जोडिति इमले माड्या**
**गुणवंतांना मात्र झोपड्या**
**पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा**
**वेश्येला मणिहार!**
**वाईट तितुके इथे पोसले**
**भलेपणाचे भाग्य नासले**
**या पृथ्वीच्या पाठीवर**
**ना माणसास आधार!**

# कन्फ्युजन

**सध्या भारतातील काही लोक सोडल्यास बहुतेक जण कन्फ्युजनमध्ये आहेत. दररोज उठावे अन् पाहावे तर एक एक बातम्या समोर येतात, अरे, असे कसे घडले? असे प्रश्न पडतात आणि कन्फ्युजन अधिकच वाढत जाते.**



**चंद्रलेखा बेलसरे-जगताप,** पुणे
९८५०८९५०५१

अचानकच एका रात्री ८ वाजता समजले की, चलनातील पाचशे अन् हजाराच्या नोटा बंद करण्यात आल्यात. हा खरंच मोठा धक्का होता. कळेच ना की आज रात्री आठ वाजेपर्यंत ज्या चलनाचा वापर आपण करत होतो, तेच चलन असे काय झाले की ते व्यवहारातून बाद करण्यात आले? सकाळी सर्वांप्रमाणे मी देखील बँकेत गेले. बँकेच्या एका ऑफिसरसमोर बसलेली असताना मी सहज म्हणाले, ''मला वाटले हा तडकाफडकी घेतलेला निर्णय पाहून जनता रस्त्यावर उतरेल!'' तर ती ऑफिसर म्हणाली, ''बहुतेक हा निर्णय चांगला असेल म्हणूनच जनता विरोध करत नाही अन् म्हणूनच रांग लागलीय.'' पुढे ह्या अततायी निर्णयाचे काय अन् कसे झाले? याचा इतिहास सर्वश्रुत आहेच.

नंतर आली एक देश, एक कर प्रणाली! सुरुवातीला वाटले, कदाचित ही प्रणाली देखील जनहितासाठी असावी पण तरीही मनात संभ्रम होताच. तो संभ्रम दूर करण्यासाठी बरेच दिवस अनेक अर्थतज्ज्ञ, चार्टड अकाउंटंट, सी.एस. यांचे मार्गदर्शन घ्यावे लागले. पाचशे, हजार रुपये भरून त्या सत्रात भाग घेऊन तीही प्रणाली समजून घेण्याचा प्रयत्न केला. आलिया भोगाशी... शेवटी काय करणार? आपले ज्ञान अपडेट करण्याचा प्रयत्न केला. पुढे त्याचे जे परिणाम भोगावे लागले, ते आजतागायत संपलेले नाहीत. असो.


नंतर आला राम मंदिर उभारण्याचा संकल्प! न्यायालयाने दिलेली क्लीनचीट! मग बातम्या येऊ लागल्या, राम मंदिरासाठी अमक्या-अमक्या ठिकाणाहून शीळा आणली जातेय, असे असेल राम मंदिराचे स्वरूप! त्यासाठी एवढी जमीन उपलब्ध झालीय वगैरे... वगैरे! उत्सुकता वाढत गेली अन् अथक प्रयत्नानंतर राममंदिर उभारले गेले. आमचे रामलल्ला स्वगृही विराजमान झाले. सर्वत्र 'जय श्रीराम'चे नारे गुंजू लागले. 'रामराम'च्या ऐवजी 'जय श्रीराम' ही घोषणा अस्तित्वात आली. त्याचेही काही वाटले नाही. चला रामराम नाही तर जय श्रीराम तर आहेच ना? त्यातही राम आहेच ना? एवढासा तर बदल झालाय! अन् बदल हा स्वीकारण्यात काय आपत्ती असणार? एवढ्या वर्षाचे स्वप्न अस्तित्वात आले, हे काय कमी होते? आनंदच झाला.

पुढे उरी, पुलवामा, चीनची घुसखोरी, पहलगाम ही सर्व रणसंग्रामे पाहायला मिळाली. प्रत्येक ठिकाणी मिळालेल्या विजयाने उर अभिमानाने भरून आला. देश प्रगतीपथावर आहे, याची सुखद अनुभुती अनुभवायला मिळाली. आपला देश तीन ट्रीलियन डॉलरचे ध्येय पूर्ण करणारच! चांगलीच गोष्ट होती.

आता देश विकसित होत चाललाय, देशातील बेरोजगारी संपण्याच्या मार्गावर आहे, शेतकऱ्यांच्या मालाला दीडपट भाव मिळेल, ते संपन्न होतील, शिक्षणाचा स्तर उंचावत चाललाय. आमची युवा पिढी शिक्षित होऊन देशाची अधिक उन्नती करेल, अशी स्वप्ने आम्ही पाहू लागलो.

इकडे बाजारातील सर्वच वस्तूंचे भाव वाढू लागले. ४०० चा गॅस ११५० वर येऊन पोहोचला. जीवनावश्यक वस्तूंवर जी.एस.टी लावला गेला, वीस हजाराचे सोने - दोन लाखावर येऊन पोहोचले, शिक्षण महागले, सरकारी संस्था एकामागून एक संपत गेल्या, त्या जागी खाजगीकरण सुरु झाले. चला, काहीतरी बदल होतोय म्हणून तेही स्वीकारत गेलो. मरता क्या न करता? अशी स्थिती येऊन ठेपली.

संगणक युग सुरु होतेच. आमची युवा पिढी प्रगती पथावर अग्रेसर होत चालली होती. सोशल मीडिया कार्यान्वीत होत चालला होता. व्हाट्सॲप युनिव्हर्सिटी अधिक समृद्ध होत चालली होती.




प्रत्येकाच्या हातात मोबाईल दिसू लागला होता. अगदी झाडू मारणारी बाई ते भाजी विकणारी मंडळी देखील फोन पे, गुगल पेच्या माध्यमातून व्यवहार करू लागली होती. हे पाहून विकास होत चाललाय, जनतेचे राहणीमान उंचावत चाललेय, हे पाहून खरंच समाधान वाटू लागले. प्रत्येकाची जीवनाची लढाई सुरु होतीच. महागाईने उंची गाठली होती. व्हाट्सॲप युनिव्हर्सिटीमधून ज्ञानात भर पडत चालली होती. देश स्वतंत्र करण्यासाठी ज्या महात्म्यांनी, देशभक्तांनी, क्रांतिकारकांनी बलिदान दिले होते, त्यांच्याबद्दल काही बाही लिहून येऊ लागले. काल ज्यांच्याबद्दल आदर होता, अभिमान होता, त्याच लोकांना आता आमची पिढी नावे ठेवू लागली होती. त्यांच्या चुका काढू लागली होती. त्यांना शिव्या देऊ लागली होती. गरळ ओकू लागली होती. सनातन धर्म, हिंदुत्त्व ह्यावर बोलू लागली होती. राम नामाचा जप करू लागली होती.

धर्माबद्दल अभिमान असणे, ही काही वाईट गोष्ट नव्हती पण त्याचा अतिरेक होऊ लागला. जो उठेल तो कोणाच्याही चारित्र्यावर, कर्तृत्वावर शिंतोडे उडवू लागला अन् जाणवले, अरे, हे काय होतेय? जे चाललेय ते योग्य आहे का अयोग्य? परत कन्फ्युजन होऊ लागले. जो सरकारच्या बाजूने बोलेल, तो देशभक्त, जो विरोधात बोलेल तो देशद्रोही! ही संकल्पना अस्तित्वात आली. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या जोरावर वाट्टेल तसे वक्तव्य होऊ लागले. रामनामाचा तर इतका अतिरेक झाला की, बिचाऱ्या त्या रामाचाच राग येऊ लागला. त्या नामाची एक आगळीच जादू जनमाणसाच्या अंगात एवढी भिनली की, आपण रामराज्यात तर जगत नाही ना? हा संभ्रम निर्माण होऊ लागला पण कल्पनेतील रामराज्याचा कुठेच अनुभव येत नव्हता. हं, रामाच्या नावाने दंगे-धोपे मात्र सुरु झाले होते. कदाचित राम देखील या गोष्टींनी चक्रावला असेल! रामराज्याच्या हव्यासापायी हे काय सुरु झाले? काहींना प्रश्न पडला होता पण असे घडू लागले मात्र होते.

इकडे आंदोलने सुरु होती. ती कित्येकदा चिरडली गेली. सामान्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, काही ठिकाणी नाईलाजाने जनतेच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले गेले पण पुढील अनेक वर्षे त्याची अंमलबजावणी मात्र झालेली दिसून आली नाही. जनतेची मागणी, त्यांचे प्रश्न ह्याचे भिजत घोंगडे अद्यापही तसेच पडून आहे. त्यांना बासनात गुंढाळून ठेवले गेले. शेवटी कोण किती दिवस लढा देणार? जर न्यायच मिळत नसेल तर जनता एकेदिवशी कंटाळणारच ना? त्यांची सहनशक्ती अशी किती दिवस टिकून राहणार? प्रत्येकाला आपल्या पोटा-पाण्याचा प्रश्न असतोच की!

पुढे तर परिस्थिती अधिकच गंभीर होत गेली. करोनाचा प्रादुर्भाव झाला. लॉकडाउन लागले. महामारीने कळस गाठला. असंख्य जीव हकनाक गेले. काही संपूर्ण कुटुंबेच नामशेष झाली. आम्ही टाळ्या वाजविल्या, थाळ्या पिटल्या, मेणबत्या लावल्या पण काही उपयोग झाला नाही. करोनाला जेव्हा जायचे होते, तेव्हाच तो गेला.

नंतर निवडणुका लागल्या. संपूर्ण देशच निवडणुकीमय झाला. आज लोकसभा, उद्या राज्यसभा, परवा विधानसभा तर नंतर स्थानिक स्वराज्य संस्था, ह्यांच्या निवडणुका लागत गेल्या. एक देश, एक कर ह्या प्रणालीप्रमाणे एक देश, एक सरकार असावे, असे सत्ताधीशांना वाटू लागले. त्यासाठी निवडणूक आयोग, न्यायसंस्था, मीडिया सर्व जण झाडून कामाला लागले. ई.व्ही.एम.चे प्रताप दिसू लागले. एकाच पक्षाला राक्षसी मतदान होऊ लागले. त्याला विरोध करणाऱ्यास ई.डी, सी.बी.आय. यांचा धाक दाखवून त्यांच्यामागे शुक्लकाष्ट लावण्यात आले. कित्येकांना तुरुंगात टाकण्यात आले. मतदानानंतर मतदारांची संख्या लाखोंनी वाढल्याचे घोषित होऊ लागले. त्यावर आक्षेप घेतल्यास किंवा शंका व्यक्त केल्यास अनेक नवे नियम काढून त्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यास टाळाटाळ करण्यात आली. निवडणुकीत झालेली मतांची चोरी हे सर्व उघडकीला आणले तरी त्याचा फारसा उपयोग झाला नाही. विरोधकांचे हे अरण्यरुदनच ठरले कारण काहीही झाले तरी, कितीही जनता बोंबबली तरी त्यावर काही करायचेच नाही, अशी भूमिका घेतल्यावर मग काय करणार? पुढे पुढे तर धाक दाखवून उभ्या राहिलेल्या प्रतिपक्षाच्या उमेदवाराला पैसे देऊन माघार घ्यायला लावून आपल्या उमेदवाराला बिनविरोध निवडून आणण्यात आले आणि देशात काही अपवाद वगळता एकाधिकारशाही अस्तित्वात आली. तरीही विरोधी पक्ष गप्प बसत नव्हता. देशात एक ना अनेक गलिच्छ, बिभत्स्य, लाजिरवाणे प्रकार घडू लागले. त्यात आपल्या उन्मत्त नेते, प्रतिष्ठित मंडळी, प्रशासकिय अधिकारी, त्यांच्या बायका यांचा कच्चा चिट्ठा बाहेर आला. साहजिकच देशवासीयांसाठी हा आश्चर्याचा आणि कुतूहलाचा विषय बनला तर आंबटशौकीनांसाठी तो करमणुकीचा विषय बनला. व्हाट्सॲप, इंस्टाग्राम, युट्यूब यावर ढिगाने व्हिडीओ येऊ लागले. जनता ते पाहण्यात गर्क झाली. त्यामुळे मुख्य विषयावरुन जनतेचे लक्ष विचलित झाले अन् अल्पमती आणि अल्पस्मृती असलेली जनता मागचे सर्व प्रश्न, कांड विसरून समोर दिसेल त्या विषयावर विचार करू लागली पण त्यावर विचार, चर्चा करून जनतेचे प्रश्न सुटणार होते का? ज्याने वाईट कृत्य केले त्याला कदाचित न्यायव्यवस्था शिक्षा देईलही पण त्याने भारतवासीयांचे जीवनाशी निगडित प्रश्न सुटणार आहेत का? आम्हाफला सुखी, समाधानी, वैभवशाली जीवन जगायला मिळणार आहे का? सारेच कन्फ्युजन आहे. एखाद्या भोंदूबाबाच्या आहारी जाऊन भ्रमित होणे वेगळे आणि धर्माच्या नशेची अफूची गोळी खाऊन संभ्रमित होणे वेगळे! त्या कन्फ्युजनमधून, त्या संभ्रमित अवस्थेतून जनता कधी जागी होईल, त्या चक्रव्यूहातून आम्ही कधी बाहेर पडू? काळच सांगेल. तूर्त एक एक चक्रव्यूह भेदून त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करू यात. स्वतःपुरते तरी शहाणे होऊ यात. निवडणूक आयोग, न्यायसंस्था, पोलीस दल, राजकारणी यांना तरी आपण आज नमवू शकत नाही पण पैसे न घेता मतदान करून, शिक्षित असूनही भोंदूबाबा किंवा बाया ह्यांच्या भुलाव्याला न भुलून, धर्मांधता न बाळगून आपण या महागाईच्या जमान्यात निदान जिवंत राहण्याची कसरत तर करूच शकतो ना? भलेही सरकारदरबारी असलेली आपली कामे होतील ना होतील, त्यांच्यासाठी आपल्याकडे पर्याय नाहीय पण दिवसरात्र मेहनत करून, नैतिकता बाळगून आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार तर बनूच शकतो ना? तर लोक हो, आता कोणत्याच गोष्टींचे वाईट वाटून घेऊ नका. हक्कासाठी भांडू देखील नका. समाजात काही वाईट घडले तरी त्यावर व्यक्त होऊ नका. तुमचे हे रुदन कोणीच ऐकणार नाही. ते आपल्या मस्तीत जगत आहेत. जेवढा काही उतमात करायचा आहे, तो त्यांना करू द्यात. रात्रीनंतर दिवस उजाडतो, हे शाश्वत सत्य आहे. आज ना उद्या किंवा आपल्या हयातीनंतर का होईना, तो सोनियाचा दिवस नक्कीच उजाडेल, यावर विश्वास ठेवा. फक्त तो दिवस पाहण्यासाठी, ते रामराज्य अनुभवण्यासाठी आपण नसू, हे मात्र नक्की!

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# वारीया चांदण्या... अन् राघववेळ




विजयालक्ष्मी मणेरीकर
(लक्ष्मीमंगेश), नाशिक
९८२२६८३७९९


**ग्रेसचा 'संध्याकाळच्या कविता' हा कवितासंग्रह हातातून बाजूला ठेवून दिला. संध्याकाळ खरंच उदास असते का? हे अनुभवण्यास माझ्या घराच्या टेरेसवर आले, तो काय आश्चर्य! संध्याकाळ बिलकुल उदास नव्हती.**



थोडी थोडी मंद हवेची झुळूक स्पर्श करत मनास रोमांचित करू लागली. आकाशात एकटक बघत बघत चांदण्यांची सैर करु लागले. निरभ्र आकाश, मंद वारा, आमच्या बंगल्यातील नारळाच्या झावळ्यांनाही वारीयाच्या गार स्पर्शात झुलवून घेण्याचा मोह आवरेना... तीन मजली बंगल्याच्या टेरेसच्याही कितीतरी वरपर्यंत पोहोचलेल्या नारळाच्या हिरव्यागार झावळ्याही सुखावून वाऱ्याशी मंद मंद धूंद धूंद मंजुळ हितगुज करत होत्या. भरगच्च नारळांनी लगडलेल्या गर्भारणीसारख्या हिरव्याकंच झाडास वाऱ्याच्या रुपात जणू सखाच भेटला!

**वारीयाची मंद झुळूक अंगाशी अल्हाद येते**
**तव स्मृतींच्या दुलईत मी आकसुन पहुडते**
**किती झोंबतो सर्वांगी हवेहवेसे वाटते**
**सलगीची गोड लहर वाऱ्यास कशी बरे येते?**

उन्हाळ्यात सगळंच रुक्ष, रखरखीत नसतं, सायंकाळचे असे काही क्षण चोरायचे असतात. हातात हात घेऊन सोबत बसायला कोणी नसलं तरी वाऱ्यास सखा मानून थोडं गायचं असतं... चांदण्यात फिरताना माझा धरलास हात, सख्या रे आवर ही सावर ही चांदरात, चांदरात... हे लिहिताना सुरेश भट खरंच का कधी प्रत्यक्षात चांदण्यात बसले असतील? अन् संगीतकार हृदयनाथांस खरंच का कधी त्यांच्या प्रियेने मनातले सांगितले असेल? सांग कशी तुजविनाच पार करू पुनवपूर, तुज वारा छळवादी अन हे तारे फितूर, श्वास तुझा मालकंस स्पर्श तुझा पारिजात! प्रिया जवळ नसताना मालकंसातील श्वास अनुभवणं अन् त्याच क्षणी पारिजातकाचा तरल सुगंधी स्पर्श जगणं हे तीच करू जाणे... कोण? अभिसारिका! एवढी हिंमत प्रत्यक्ष प्रियकरात सुद्धा नसते. मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे, मोकळ्या केसात माझ्या तू जीवाला गुंतवावे... लिहिणारे सुरेश भटांच्या अंतरंगात एखादी अभिसारिकाच निर्वासित असावी. किती जणांस हे स्वर्गीय अप्सरेचं मलमली तारुण्य पहाटेस एकाकाराची अनुभूती देतं? मिलन स्वर्गीय केवळ प्रेमातच भासते अन्यथा नुसता समागम हव्यासाचा. सायंकाळ आता गडद गडद होत चालली होती तसतशी आकाशातील चांदण गोंदण अधिक प्रकाशत चालली होती. अहाहा किती त्या चांदण्या चंद्राभोवती दाटल्यात! प्रत्येकीच्या वाट्यास कितीसा तो येणार?

**चंद्र आता मावळाया लागला**
**प्राण माझाही ढळाया लागला**
**श्वास गालाला छळाया लागला**
**प्राण माझाही ढळाया लागला...**

चंद्राची अवस्था अगदी श्यामरंगी श्यामलासारखी झाली होती. चांदण्यारूपी गोपिकांनी सगळीकडून घेरून त्याच्यावर चुंबनांचा वर्षाव करू लागल्या होत्या. आकाशात सायंकाळच्या या प्रसन्न प्रहरी उगवण्याआधी मावळूनच जातो की काय अशी चंद्राची अवस्था झाली होती. चंद्र कितीही लोभस असला, चांदण्या त्यावर कितीही भाळल्या तरी चंद्रासही वरवरची आसक्तता आता नकोय... कोणी एकच सखी हवीय जी सोबत उगवेल, सोबत मावळेल, सोबत उजळेल अन् सोबत अनंतात विलीन होईल... का नको चंद्राने अशी स्वर्गीय कल्पना करावयास?

त्या आकाशभर चांदण्यांच्या गराड्यातही चंद्राची नजर तिच्यावर स्थिरावते अन् ती शहारते... पण तो संधी सोडत नाही. तो सांगितल्यावीन राहत नाही... तोच मी होतो गडे गं, तोच मी जो तुला आता कळाया लागला...

दिवसभर उन्हाची रणरण. डोळे अक्षरशः जळून गेले म्हणून ह्या गारव्यात अंग लपेटून घेतेय... गारवा वाढत चाललाय... शिरशीरी भरत चाललीय...

शेवटी पुन्हा ग्रेस स्मरतात. नभाला धरबंध नाही, तळहातावरील वळीव स्पर्शाचा. उशालगतच्या गंधगार रात्रीत गुरफटलेले क्षितिज दूर ढकललेस आणि बुडून गेलास... तुझ्याच आघाताने का टळून जात नाही सुरंगी गात्रांना कुरतडणाऱ्या राघववेळेचा प्रहर?

---

# मनक्षितिजाच्या पल्याड




मंगेश दौंडकर
भोसरी, पुणे
९८९०६१९३५४


**सह्याद्रीच्या निसर्गरम्य दऱ्याखोऱ्यांत लपलेलं क्षितिज दुर्गप्रेमींना नेहमीच साद घालतं. क्षितिज म्हणजे केवळ साहस नव्हे तर ते एक ध्येय असतं, एक ओढ असते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, ते एक आव्हान असतं – जे मनाच्या अगदी खोलवर स्पर्श करतं! पण माझ्या आयुष्यातील हे क्षितिज काहीसं वेगळं आहे. ते केवळ गडकोट सर करण्यापुरतं मर्यादित नाही तर माझ्या मुलामध्ये खोलवर रुजलेल्या निसर्गप्रेमातून जन्मलेलं आहे.**

काही गोष्टी या माणसाकडे निसर्गतः आलेल्या असतात. सह्याद्रीच्या रानवाटांची भुरळ त्या कोवळ्या जीवालाही पडली, ही निसर्गाची एक अनोखी शिदोरीच म्हणावी लागेल. सह्याद्रीच्या मातीतून फुटलेला हा नवांकुर आमच्यातल्या पालकत्वाला जणू आव्हान देत असतो.

वर्षाऋतूमध्ये रानवाटांचं एक आगळंवेगळं सौंदर्य असतं. जसं मानवी आयुष्य क्षणभंगुर, तसंच निसर्गसौंदर्यही – क्षणात उमलणारं, क्षणात हरवून जाणारं. निसर्गाने आज दाखविलेला आविष्कार उद्या पाहायला मिळेलच, याची शाश्वती नसते. अशा वेळी शहरी पिंजऱ्यात अडकलेलं आमचं मन सह्याद्रीच्या दिशेने झेपावू लागतं.

त्या दिवशीही अशाच एका ओढीने आम्ही बाहेर पडलो. मनात उत्साहाची वादळं उठली होती. वाटलं होतं, आज काहीतरी नवं अनुभवायला मिळेल. निसर्गाची गुपितं उलगडतील, एखादा झरा गाणं गाईल, पानांमधून सोनकिरणं झिरपतील आणि कदाचित एखादा क्षण कायमचा आठवणीत कोरला जाईल.

परंतु निसर्गाच्या मनात त्या दिवशी काहीसं वेगळंच असावं. गडाच्या पायथ्याशी पोहोचताच सारं काही क्षणात विरघळून गेल्यासारखं वाटलं. धुकं एवढं दाट होतं की दोन पावलं पुढे काय, हेही कळेनासं झालं. निसर्गानं स्वतःभोवती जणू गूढ चादर पांघरली होती. आमच्या सगळ्या अपेक्षांना, उत्साहाला धुक्याने कवेत घेतलं होतं.

आमची घोर निराशा झाली. माघारी फिरावं म्हणून गाडीकडे वळलो. तोच दाट धुक्यातून दूरवर एक अस्पष्ट हालचाल दिसू लागली. मदतीच्या आशेनं आरोळी ठोकताच साधारण त्रिकोणी आकाराची ती अबोल काळसर सावली आमच्या दिशेनं सरकू लागली. जसं ते गूढ



आमच्या जवळ येऊ लागलं तसं माझ्या बोटाची ती छोटीशी पकड घट्ट झाल्याचं मला जाणवलं. त्याच्या डोळ्यांत भीती होती पण त्याहून अधिक होतं ते कुतूहल. काय असेल? कोण असेल? या प्रश्नांनी मलाही क्षणभर गोंधळून टाकलं.

हळूहळू ती सावली स्पष्ट होऊ लागली आणि धुक्याच्या आडून एक हाडकुळं पण ठाम अस्तित्व समोर आलं. क्षणभर हसू आलं! साधारण सत्तर ते ऐंशी वर्षांची एक आजीबाई डोक्यावर सरपणाची मोळी घेऊन आपल्या घराच्या दिशेने निघाली होती. दाट धुक्यात ती आजी आम्हाला लवकर दिसली नाही परंतु तिच्या डोईवरची वाळलेल्या सरपणाची ती मोळी आधी दिसली. हवेतून वरच्या वर ती आकृती आपल्या दिशेने तरंगत येत आहे हे पाहून तो भांबावला असावा.

धुक्याची चादर हळूहळू विरू लागली. आजीच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या स्पष्ट दिसू लागल्या. त्या क्षणी, हरवलेल्या वाटेवर आशेचा एक किरण चमकून गेला. आदिवासींच्या चेहऱ्यावरील सुरकुत्या म्हणजे जणू रानवाटांची गुंतागुंतच! काळजीनं उमटलेल्या रेषा, अनुभवांतून मिळालेली वळणं आणि धैर्यानं कोरलेली शांतता. त्या सुरकुत्यांमध्ये आदिवासींच्या आयुष्याचा संपूर्ण प्रवास दडलेला असतो. आजीने दाखवलेली गडाची वाट, आयुष्याच्या प्रवासात अविस्मरणीय ठसा उमटवून गेली.

तो प्रसंग आठवला की आजही ओठांवर हसू उमटतं. त्या दिवशी आमच्याकडून गड सर झाला की नाही याला विशेष अर्थ नव्हता; कारण त्या क्षणी समोर उभ्या असलेल्या आजीच्या डोळ्यांतच आम्हाला क्षितिजाची एक झलक दिसली होती. सांगण्याचं तात्पर्य, खरं क्षितिज कुठे बाहेर नसतं, ते आपल्या मनाच्या गाभ्यात असतं. ते शोधावं लागतं, अनुभवावं लागतं! आणि मग एक दिवस, अशाच एखाद्या धुक्याच्या पडद्यामागून ते आपल्यासमोर स्पष्ट होतं.

अनिल दातीर
सातारा
९४२०४८७४१०

# शांतता... पुढे युद्ध चालू आहे!

**इस्राईल-अमेरिका आणि इराण युद्ध सुरू होऊन पाहता पाहता महिना उलटून गेलाय. अजून किती दिवस हे युद्ध चालेल, कोणाचे किती नुकसान होईल, कोण जिंकेल, कोण हरेल याबद्दल भल्या भल्या धुरिणांची मती कुंठित झालीय. कोणत्याही जागतिक घडामोडीवर रिॲक्ट होणारे जगातले शेअर बाजार सुद्धा गोंधळलेत. अनेकदा धाडकन कोसळत आहेत तर एखादे वेळी कधी सर्रकन वर जात आहेत. रोज हजारो-लाखो-कोट्यवधी रुपये क्षणात उलटेपालटे होत आहेत. हमखास आतल्या गोटातल्या बातम्यांवर पैसे कमावणारा, कमावून देणारा सट्टा बाजार देखील दिशाहीन झाला आहे.**



युद्धाची सगळ्याची सुरुवात इस्राईलकडून झाली खरी पण अमेरिकेने त्यात पडून आगीत तेलच ओतले. खरे तर इस्राईल हा आपल्या अस्तित्त्वाची लढाई लढतोय. व. पु. काळेंच्या भाषेत सांगायचं तर आम्हाला शांततेची आवड आहे हे देखील युद्ध करून सांगावे लागते हे मानवाचे दुर्दैव आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी हमासने केलेल्या अमानुष हल्ल्यात इस्राईलमध्ये झालेला नरसंहार, इस्रायली नागरिकांना बंदी बनवून त्यांच्यावर केलेले अत्याचार हे सर्व याच्या मुळाशी आहेच पण तरीही इस्राईलच्या आत्ताच्या विध्वंसाचे समर्थन केले जाऊ शकत नाही. इस्राईलने आता क्रौर्याची परिसीमा गाठली आहे. गेल्या वर्षभरात इस्राईलने गाझापट्टीचे पार वाळवंट करून टाकलेय. तिथला इमारतींचा ढिगारा हटवून पुन्हा शहर उभारायला प्रचंड वेळ आणि पैसा लागणार आहे, तो हमास कधीच मिळवू शकणार नाही. सध्या इराणच्या अनेक शहरांवर बॉम्ब आणि मिसाईल टाकून तिथली मानवी वस्ती उद्ध्वस्त केली जात आहे. गाझासारखेच लेबेनॉनमधील कित्येक किलोमीटरमधील रहिवाशी इमारती उद्ध्वस्त करून काँक्रीटचे ढिगारे बनवायचे काम जोरात सुरू आहे.

यालाही कारण आहे ते इराणची वाढत असलेली शस्त्रसज्जता. इराणने अणुबॉम्ब तयार केला तर तो त्याचा पहिला वापर इस्राईलवर करणार आणि इस्राईलला कायमचा संपवणार हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. अमेरिकासुद्धा याच मुद्द्यावर इस्राईलच्या बाजूने युद्धात उतरली आहे पण इस्राईलची मोसाद+आयडीएफ आणि अमेरिकेची सीआयए या दोघांचाही इराणचा अभ्यास अत्यंत तोकडा ठरला आहे. मुळात धर्मावर अवलंबित्व असलेले कट्टर मुस्लिम प्रशासन युद्धाची इतकी आधुनिक आणि बारीक तपशीलवार तयारी करत असेल आणि त्यात त्यांनी एवढा मोठा पल्ला गाठला असेल याचा कोणालाच अंदाज आला नसावा. मला तर शंका आहे की याची थोडी फार कल्पना इस्रायलला असूही शकेल पण त्यांनी ती माहिती अमेरिकेला दिली नसावी कारण एकटा इस्राईल इराणला संपवू शकला नसता आणि तशी क्षमता असती तरी एकट्या इस्राईलने केलेल्या हल्ल्याचा सर्व जगाने धिक्कार केला असता. परिणामी इस्रायलला युद्ध थांबवावे लागले असते.

इस्राईलचे मनसुबे मात्र इराण-इराक-येमेन-लेबेनॉन-सीरिया बरोबरच हमास, हुती, हेजबोल्लाह अशा दहशतवादी संघटनांचे कायमचे कंबरडे मोडायचे आहे. यासाठी इस्राईलने अमेरिकेला इमोशनली ब्लॅकमेल करून इराण अमेरिकेसाठी सुद्धा कसा धोकादायक ठरू शकतो हे पटवून देऊन आपल्याबरोबर युद्धात उतरणे भाग पाडले आहे. अमेरिका युद्धात उतरल्यामुळे या युद्धाचे परिणाम आणि परिमाण सुद्धा बदलून गेले. जगातले अनेक देश इकडे जावे की तिकडे जावे या पेचात पडले आहेत. भारतासारख्या शांतीचा संदेश देणाऱ्या देशांना आपली तटस्थ भूमिका वठवायला तारेवरची कसरत करावी लागत आहे. भारत आतापर्यंत तरी यात सफल झाला आहे. इस्रायलची दोस्ती सांभाळून सुद्धा इराणशीही मैत्री टिकवून आहे. होर्मूझ खाडीतून आपली जहाजे सुरक्षित आणण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न भारत सरकार करत आहे. असे करणारे मोजके दोन-तीन देशच आहेत हे विशेष.

आपण इराणला चार-दोन दिवसात वठणीवर आणू हा इस्राईल-अमेरिकेचा अति आत्मविश्वास इराणने पहिल्या आठवड्यातच धुळीला मिळवला. एखाद्या राष्ट्राचा अध्यक्ष किंवा हुकूमशहा किंवा सर्वोच्च नेता संपवला की तो देश लगेच लोटांगण घालतो हा आतापर्यंतचा इतिहास होता. काही महिन्यांपूर्वी अमेरिकेने अगदी सहज मोजक्या सैनिकांच्या मदतीने व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांना उचलून नेले आणि तो पूर्ण देश आपला अंकित करून घेतला. युद्ध सुरु होताच दुसऱ्याच दिवशी इस्राईल-अमेरिकेने संयुक्तपणे इराणचे शहेनशहा अयातुल्लाह खामेनेई यांच्यासह त्यांच्या पन्नास उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना संपवले. सर्वांना वाटले की आता इराण लगेच शरण येईल. इराण नमत नाही म्हटल्यावर सत्तेत येईल त्या प्रत्येकाला यांनी संपवले, नवा सर्वोच्च नेता झालेला मोजतबा खामेनेईला सुद्धा जखमी केले पण इराण बधला नाही. सध्या हे मोजतबा खामेनेई रशियाच्या संरक्षणाखाली आहेत अशी गुप्त वार्ता आहे.

माझ्या मते इराण माघार न घेण्याची अनेक कारणे आहेत. पहिलं म्हणजे १९७९ ला इराणमधील राजसत्ता उलथवून टाकून इस्लामिक प्रशासन अस्तित्वात आल्यापासून त्यांचे पहिले टार्गेट होते ते इस्राईलला समूळ संपविणे. आजूबाजूच्या इस्लामी कंट्रीजमध्ये शिरकाव केलेल्या इस्राईलचे अस्तित्त्वच त्यांना मान्य नव्हते. या तिरस्काराचे मूळ आहे ते जेरुसलेम हे शहर. जेरुसलेम हे शहर ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम या तीन प्रमुख धर्मांसाठी जगातील सर्वात पवित्र शहर मानले जाते आणि त्यावर सध्या इस्राईलचा ताबा आहे. मुस्लिम देशांना म्हणूनच इस्रायलला संपवून आपलं पवित्र धर्मस्थळ ताब्यात घ्यायचं आहे. इस्राईलला अमेरिका मदत करतो म्हणून एक ना एक दिवस आपल्याला अमेरिकेबरोबरही निर्णायक लढाई करायची आहे हे इराणी सत्ताधीश पहिल्यापासून जाणून आहेत आणि त्या दृष्टीनेच त्यांचे प्रयत्न चालू होते. इराणला अण्वस्त्रधारी व्हायचं होतं हेही याचसाठी.

इस्राईल अमेरिका वेळोवेळी त्यांच्या प्रयत्नांमध्ये खीळ घालण्याचा प्रयत्न करत होते. काही महिन्यांपूर्वी अमेरिकेने इराणचा अणुकार्यक्रम उद्ध्वस्त केल्याचा दावाही केला होता पण इराण नेटाने प्रयत्न करत राहिला आणि त्यांचे प्रयत्न किती खोलवर होते याची प्रचिती आत्ता येतेय. जमिनीखाली अडीचशे फुटावर त्यांनी अख्खे अंडर ग्राउंड शहर उभे केले आणि तिथे अनेक क्षेपणास्त्र, ड्रोन, बॉम्बचा प्रचंड साठा करून ठेवलाय. काही विमाने, रॉकेट लाँचर्स, सुद्धा त्यांनी जमीनीखाली सुरक्षित करून ठेवलीत आणि आज त्याच्याच जोरावर एकटा इराण हा इस्राईल आणि अमेरिकेच्या बलाढ्य ताकदीला अपुरी ठरवत आहे.

दुसरे एक महत्वाचे कारण म्हणजे इराणकडे तीन प्रकारचे सैन्य आहे. इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण आर्मी (थोडक्यात शासकीय सैन्य) इस्लामिक रेव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स आणि बासिज रेजिस्टन्स फोर्स. यापैकी दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या सैन्याचे पूर्ण नियंत्रण हे सुप्रीम लीडरकडे असते. इराणियन सर्वोच्च नेत्यांनी अत्यंत धूर्त विचार करून या तीनही सैन्यांना युद्धजन्य परिस्थितीत स्वतंत्र निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले आहेत. तुमचे बलिदान हे इस्लामसाठी किती पवित्र आहे हे या सैनिकांच्या मनावर बिंबवल्यामुळे त्यांना मरणाची भीती नाही. केवळ याचमुळे सर्वोच्च नेता मारला जाऊन, इतर पन्नासपेक्षा जास्त नेते मारले जाऊनही इराणचे हल्ले अजिबात थांबलेले नाहीत. उलट आपल्या नेत्यांच्या मृत्युचा बदला घ्यायचाच या ध्येयाने प्रेरित होऊन त्यातली धार दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

इराण आणि अरब राष्ट्रे सामान्य लोकांच्या मते दोनीही मुस्लिम राष्ट्रे आहेत हे खरं असलं तरी त्यांच्यातही शिया आणि सुन्नी अशी अस्तित्त्वाची लढाई आहेच. अनेक अरब राष्ट्रांनी अमेरिकन सैन्याला आपल्या देशात सैन्यतळ उभारायला परवानगी दिली त्यामागे इराणला कधी ना कधी संपवणे हाच उद्देश होता. त्यांचे हे संरक्षण छत्री इराणने कमकुवत ठरवले आहे. सर्वात सुरक्षित असलेले दुबई (युएई) सारखे देश मेटाकुटीला आलेत. अमेरिका आपले संरक्षण करू शकत नाही हेही त्यांना कळून चुकले आहे. युएई, सौदी अरेबिया, कतार, ओमान, बहारीन, कुवेत, जॉर्डन हे सगळेच देश इराणच्या हल्ल्यांनी बेजार झाले आहेत. अमेरिकी सैन्य तळ म्हणत म्हणत इराण रहिवाशी हॉटेल्स, अमिराती यांनाही लक्ष करत आहेत आणि काल तर त्यांनी मायक्रोसॉफ्ट ॲमेझॉन, वॉलमार्ट, ॲपल, गुगल अशा नामांकित अमेरिकन कंपन्यांवर हल्ले केले जातील असे जाहीर केले आहे. मार्चच्या पहिल्याच दिवशी दुबई आणि बहारीनमधील अमेझॉन कंपनीवर इराणने ड्रोन हल्ले केले सुद्धा. याचा परिणाम म्हणून सगळ्याच कंपन्या घाबरल्यात. इराणला आवरणे अमेरिकेला आणि इसराईलला अवघड झाले आहे. त्यामुळे ते चिडून इराणवर अजून जबरदस्त हल्ले करत आहेत. त्यात आता तर ऑइल, गॅस, पॉवर सप्लाय, वॉटर सप्लाय अशा बेसिक सुविधांचाही समावेश होऊ लागलाय. तिकडे जमिनीखाली बसलेल्या इराणी सैनिकांना याच्याशी काहीही देणेघेणे नसल्यासारखे ते मिसाईल आणि ड्रोनचा मारा करत आहेत. इस्राईल-अमेरिका आम्ही इराणचा खात्मा केला, त्यांची मिसाईल्स नष्ट केली त्यांचे ड्रोन्स संपवले, त्यांची जहाजे, लढाऊ विमाने संपवली असे सांगत आहेत पण प्रत्यक्षात मात्र इराणच्या हल्ल्यांमध्ये थोडीशीही शिथिलता आलेली नाही. नशीब अमेरिकेच्या दबावाला बळी पडून नाटो देश, फ्रांस, जर्मनी, इंग्लंड, तुर्की अजून प्रत्यक्ष युद्धात उतरलेले नाहीत. त्यांना आजच अमेरिकेने नाटोमधून बाहेर पडण्याची धमकी दिली आहे. दुसऱ्या बाजूला रशिया-चीन-उत्तर कोरिया आतून इराणला मदत करत असतीलही पण प्रत्यक्षात युद्धात नाही.

तात्पर्य एकच, हा कठीण काळ कधी संपेल हे देवाला-अल्लाला-येशूला कोणालाच सांगता येत नाही. आपण भारतीय तसे बऱ्यापैकी सुखात आणि सुरक्षित आहोत. काही विरोधी पक्षांना मात्र ही शांतता बघवत नाही. काहीही करून भारतातही अस्थिरता निर्माण व्हावी यासाठी त्यांचे सारखे प्रयत्न चालू आहेत. अफवा, शाब्दिक हेटाळणी, डिवचणे चालूच आहे. जेव्हा प्रश्न देशहिताचा असतो तेव्हा राजकारण सोडून, आपसातील वैर तात्पुरते बाजूला ठेवून सरकारला पाठिंबा देणे ही नैतिकता असते. इतर अनेक देशांमध्ये महागाई वाढली आहे, पेट्रोल-डिझेलचे भाव वाढले आहेत, काहींनी तर अणीबाणी लागू केली आहे. सगळं जगच या युद्धाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष झळा सोसत आहे. या मुख्य युद्धाच्या बातम्यांमध्ये रशिया-युक्रेन, पाकिस्तान-अफगाणिस्तान, सुदान-येमेन आणि अजूनही छोटी-मोठी युद्धे चालू आहेत. त्यांना कोणीच महत्त्व देत नाही. असो! नुकताच सुरु झालेला एप्रिल वसंत ऋतुत झाडांना फुलणाऱ्या नव्या पालवीसारख्या काही चांगल्या बातम्या घेऊन येवो हीच सदिच्छा! ■■


घनश्याम पाटील
७०५७२९२०९२

# तिची अन् त्याची हृदयस्पर्शी गोष्ट

कल्पना आणि वास्तव ही दोन टोके कधी एकत्र येत नाहीत; मात्र कल्पनेचा आधार घेऊन आजूबाजूचं वास्तव रेखाटलं की त्यात जिवंतपणा येतो. अनेक लेखकांनी हा प्रयोग केला आहे आणि तो यशस्वीही ठरला आहे. संजना मगर या संवेदनशील कवयित्रीनं 'अभी-अनू' ही कादंबरी लिहिण्याचं धाडस केलं आणि 'तिची अन् त्याची' गोष्ट मांडताना अनोख्या प्रेमाचं, निसर्ग आणि पर्यावरण संवर्धनाचं, नैतिक मूल्यांच्या जपणुकीचं दर्शन घडवलं. एक हळूवार प्रेमकथा उलगडून दाखवतानाच आजच्या पिढीकडं असलेलं आश्वासक सामाजिक भान हे या कलाकृतीचं सामर्थ्य आहे.

या कादंबरीतील अभी आणि अनू ही दोन्ही पात्रं उच्चशिक्षित आहेत. विदेशात एका मोठ्या कंपनीत कार्यरत असलेल्या अभीच्या आईवडिलांचं निधन होतं आणि त्यांच्यानंतर गावी कोणीच नसल्यानं तिथलं घर विकण्याच्या हेतूनं तो गावाकडं येतो. तिथं अनेक वर्षांनी त्याची बालमैत्रिण अनू भेटते. एव्हाना तिही प्राध्यापक झालेली असते. सावंतांसोबत जुळत असलेला घर विक्रीचा व्यवहार अभी मोडीत काढतो आणि देवराईच्या भल्याची, गाव वाचवण्याची एक मोहीम हाती घेतो. त्यावेळी त्याचे मित्र मंदार आणि मीरा, अजय आणि जुई हेही त्याच्या बाजूनं येतात. गावावर येणाऱ्या आरिष्ठाची कल्पना हे सर्व जण गावकऱ्यांना देतात आणि पिचले गेलेले, शोषणाला बळी पडलेले ग्रामस्थही त्यांच्यासोबत उभे राहतात.

भावभावनांची प्रभावी अभिव्यक्ती आणि विचार करायला भाग पाडणाऱ्या अनेक शैलीदार, अर्थपूर्ण वाक्यांची पेरणी हे संजना यांच्या लेखणीचं विशेषत्व आहे. त्यात मनाची निखळता आहे, लालित्य आहे, सौंदर्य आहे आणि वाचकांच्या मनाचा तळ ढवळून काढण्याची, त्याला अंतर्मुख करण्याची शक्तीही आहे. वानगीदाखल काही वाक्ये पाहा –



काही जखमा भरून येत नाहीत पण त्यावरील मलम ज्याचे त्यालाच शोधावे लागते./ माणूस दूर असणाऱ्या गोष्टींना भुलतो आणि जवळच्या दिसणाऱ्या गोष्टींना नजरेआड करतो./ प्रेमात माणूस स्वभावाच्या विरूद्ध वागत असतो./ गोष्टी कानावर पडल्या म्हणजे त्याचा अर्थही ध्यानात येईल असे नसते./ व्यवहाराला भावना नसतात./ एखादी गोष्ट जी आपल्याला नकोय ती करताना किती यातना होतात, हे ज्याचे त्यालाच माहीत./ काळजाची सल काळजालाच कळते./ आपल्या माणसाच्या साध्याशा अस्तित्वाने सुद्धा मनावरचा ताण हलका होतो./ संघर्ष क्षणिक वेदना देतो पण तोच दीर्घकाळ टिकणारा संस्कार घडवतो./ म्हणणं आणि असणं यात फरक असतो... या आणि अशा कितीतरी वाक्यातून झरणारं सांस्कृतिक, वैचारिक संचित लेखिकेच्या प्रगल्भतेची साक्ष पटवून देतं.

अभी आणि अनूने बालपणी शाळेच्या चर्चासत्रात 'अमेरिका आणि तेथे स्थायिक झालेले भारतीय' या विषयावर भाष्य करत शाळेला पहिला क्रमांक मिळवून दिला होता. पुढे मोठेपणी अमेरिकेतील वास्तव्यानंतर अभी गावाकडे येतो आणि अनूच्या महाविद्यालयात जातो. तिथे जी स्पर्धा असते त्याचा विषय असतो, 'परदेशात लग्न करून जाणारे भारतीय आणि त्यांची बदलत जाणारी जीवनपद्धती!' संजना यांनी या कादंबरीत असे अनेक सुसंगत धागे गुंफत वाचकांना खिळवून ठेवले आहे.

एका व्यावसायिक कटाचा भाग बनत गावाचे अस्तित्व धोक्यात आलेले असते. अभी आणि अजय हे दोघेही त्याच कंपनीत नोकरी करत असतात. आपली कंपनी केवळ नफा कमवण्यासाठी गावचे अस्तित्त्व मिटवून टाकत आहे, हे लक्षात आल्यावर ही मंडळी बंड पुकारतात. त्यासाठी ते त्यांची नोकरीही पणाला लावतात. त्यांना शांत राहण्यासाठी दुप्पट पगाराचे आमिष दाखवले जाते. तरीही ते त्यांच्या भवितव्याचा विचार न करता सत्याचा कैवार घेत आपापल्या भूमिकांवर ठाम राहतात. कादंबरी नायकाचे आणि उपपात्रांचे त्यांच्या प्रेयस्यांवरील सात्विक प्रेम तर इथे दिसतेच पण 'राष्ट्र प्रथम' ही भावनाही खूप समर्थपणे मांडली आहे. प्रसंगी न्यायालयीन लढा लढून ते आपल्या गावचे अस्तित्त्व राखतात. त्यांच्या नशिबी संघर्ष अटळ असतो पण ते सर्व प्रसंगांना धीरोदात्तपणे सामोरे जात सर्व समस्यांची उत्तरे शोधतात. त्यांच्यापुढील प्रश्न आणि त्यावरील नेटाने काढलेला मार्ग हा शाश्वत आहे. आपल्या प्रेयस्यांवरील, वाडीवरील, गावावरील, निसर्गावरील प्रेम आणि सर्वांनीच त्यांना दिलेली साथ यामुळे ही सुखात्मिकता ठरते.

संजना मगर यांनी या पुस्तकाची लिहिलेली अर्पणपत्रिका हे या कादंबरीचे सार आहे. 'घर मनामध्ये घेऊन जगणाऱ्या प्रत्येकास' या एका वाक्यात त्यांनी हा सगळा पट उभा केला आहे. संजना यांची शैली चित्रदर्शी असल्याने यावर दमदार पटकथा लिहिता येऊ शकेल आणि प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा उत्तम चित्रपट साकारू शकेल. मातीशी नाळ जोडलेली असेल तर कोणत्याही कलाकृतीचा सुगंध सर्वत्र दरवळतोच. या कादंबरीत ते साधण्याबरोबरच आश्वासक तरुणाईचे दर्शन घडते. केवळ शब्दांचे अवडंबर न माजवता साधी, सोपी भाषा वापरल्याने हा संघर्ष प्रत्येकाला आपलाच वाटेल. हेच या कादंबरीचे यश म्हणावे लागेल. 'प्रेमात जग जिंकण्याची विलक्षण ताकद असते,' या वाक्याने समारोप होणाऱ्या या कादंबरीतील 'कृपाछत्र' आणि त्यामागील हेतू हेच आपल्या संस्कारांचे लखलखते बेट आहे. संजना मगर यांच्या भावी लेखनप्रवासास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

| | | |
|---|---|---|
| **लेखिका** | – | संजना मगर |
| **प्रकाशक** | – | पुस्तकमित्र प्रकाशन |
| **पाने** | – | १५२ |
| **मूल्य** | – | ३५० |

# कोकणची माणकं



रवींद्र कामठे
पुणे
९४२१२ १८५२८


'चपराक'ची ग्रंथसूची

कोकणचे निसर्गसौंदर्य जितके 'अविस्मरणीय' आहे तितकीच कोकणची माणसेही! 'देवाची करणी आणि नारळात पाणी,' अगदी तशीच ही माणसे! वरून अगदी फणसासाठी निब्बर दिसतात पण आतून गोड गऱ्यासारखी असतात. कोकणची माणसे कष्टाळू, स्वप्नाळू आणि मायाळू, तशीच ती तितकीच कणखर व संयमीही असतात. कोकणच्या माणसांची बुद्धिमत्ता आणि त्यांच्या जीवनातील संघर्ष त्यांच्या अबोलपणामुळे सहसा पटकन समजत नाही किंवा त्यांच्या सोशिक स्वभावामुळे ते त्याची फारशी वाच्यता कुठे करत नाहीत. अशी ही पापभीरू व प्रांजळ माणसे वाचायला आणि कळायला तेवढीच मातब्बर व्यक्ती हवी आणि त्यात त्या व्यक्तिने कोकणातच जन्म घेतलेला असायला हवा हे मात्र नक्की.

अगदी असेच एक अतिशय प्रगल्भ आणि वैचारिक व सांस्कृतिक बैठक असलेले कोकणातल्या संगमेश्वर येथील ज्येष्ठ लेखक आणि पत्रकार तसेच कोकणची शान असणारे व्यक्तिमत्व म्हणजे जे. डी. पराडकर हे होय. त्यांनी लिहिलेले आणि 'चपराक प्रकाशन'च्या घनश्याम पाटील यांनी प्रकाशित केलेले 'कोकणची माणकं' हे पुस्तक नुकतेच माझ्या वाचण्यात आले.

कोकण ह्या विषयावर जे. डी. सरांची तब्बल १२ पुस्तके 'चपराक'ने प्रकाशित केली आहेत हे खास विशेष आहे. त्यामुळे जे. डी. पराडकरांना 'कोकणरत्न'च संबोधने मला जास्त संयुक्तिक वाटते. जे. डी. सरांची कोकण हा विषय मांडण्याची एक विशेष शैली त्यांच्या वैयक्तिक अनुभवाच्या मंथनातून निघालेला 'कोकम अर्क' आहे असे मला आवर्जून म्हणावेसे वाटते.

जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती अशी एक म्हण आहे. अगदी त्याच धर्तीवर 'कोकणची माणकं' हे जे. डी. पराडकर यांचे व्यक्तिचित्रण म्हणजे कोकणातल्या अगदी लहान मुलापासून ते जख्खड म्हाताऱ्या




माणसाचे अतिशय सूक्ष्म निरीक्षण करून, खूप कष्ट घेऊन, अभ्यासपूर्ण रीतीने व अत्यंत संवेदनशील पद्धतीने त्या त्या व्यक्तिमत्त्वाप्रती व्यक्त केलेल्या भावना आहेत. प्रत्येक व्यक्तिमत्त्व चित्रित करत असताना जे. डी. सरांनी त्या निमित्ताने कोकणची सांस्कृतिक समृद्धी, सण सनावळ, कौटुंबिक जिव्हाळा, नातीगोती, शेजारधर्म, सुसंगत सामाजिक व्यवस्था, आदरातिथ्य, एकोपा आणि परिस्थितीवर मात करण्याची जिद्द अगदी सहजपणे शब्दांकित करून कोकणाप्रती वाचकांची आस्था निर्माण केली आहे. कोकणातील माणसांचे स्वभाव, त्यांचे गुण आणि दुर्गुण, त्यांच्या सवयी, त्यांच्या लकबी, त्यांच्या आयुष्याचा संघर्ष, खोडकरपणा, माणुसकी, वयोमानानुसार बदलत जाणारे स्वभाव, कोकणातले बालपण, आजी आजोबांचा गोष्टी, त्यांची खाद्य संस्कृती तसेच विविध कलागुणांनी ओथंबून भरलेले अतिशय वाचनीय असे व्यक्तिचित्रण वाचल्याचे समाधान ह्या पुस्तकाने मिळते. कोकणची संस्कृती, परंपरा, रूढी, चालीरीती, कोकणच्या निसर्गाचा अभ्यास, पाना-फुलांचे, फळांचे तसेच जैववैविध्य आणि त्याचा माणसाच्या आयुष्यात असलेला उपयोग, कोकणचा समृद्ध असलेला समुद्र आणि त्याच्या खाऱ्या पाण्यातच असलेला गोडवा यांचे अविस्मरणीय असे चित्रण ह्या पुस्तकाचे अजून एक वैशिष्ट्य आहे.

'कोकणची माणकं' हे पुस्तक वाचताना मी पाहिलेल्या कोकणातील व्यक्तिंची मला अगदी नव्याने ओळख पटली. म्हणजे कोकणात गेली तीस एक वर्षे फिरूनही, कोकणचे हे असे व्यक्तिवैभव पाहण्याचे राहूनच गेले असे म्हणावे लागेल, इतके सूक्ष्म आणि खोलवर निरीक्षण जे. डी. सरांनी या पुस्तकाच्या रूपाने वाचकांना देऊन समृद्ध केले आहे असेच म्हणावे लागेल.


कोकणाबद्दलचा एक सकारात्मक दृष्टिकोन देणारे हे पुस्तक वाचताना आपण त्या व्यक्तिंमध्ये थोडा वेळ का होईना गुंतून जातो हे या पुस्तकाचे फलित आहे. मी मुद्दामहून इथे कुठलेही उदाहरण देत नाही कारण जी काही १६-१७ व्यक्तिमत्त्व या पुस्तकात आली आहेत ती सगळीच वाचण्यासारखी आहेत. त्यात त्यांच्या आजूबाजूचा गोतावळा ज्या काही खुबीने जे. डी. सरांनी शब्दबद्ध केला आहे त्याला तोड नाही. प्रत्येक व्यक्तिमत्त्वातील काही चांगल्या आणि समाजपयोगी बाबी हेरून जे.डी.सरांनी त्यांचे अनुभवकथनच या पुस्तकाद्वारे केले आहे असे मला अगदी प्रकर्षाने जाणवले. त्यामुळे हे पुस्तक वाचायलाच हवे अशा श्रेणीत आपसूकच जाऊन बसते. जे.डी.पराडकर वाचकाला कोकणच्या माणकांच्या/माणसांच्या प्रेमात पडायला लावतात हे मात्र नक्की. त्यामुळे ज्यांना कोकणाबद्दल प्रेम आहे आणि आकर्षण आहे त्यांनी हे पुस्तक आवर्जून वाचायलाच हवे. ज्यांना कोकणाबद्दल जाणून घ्यायचे असेल त्यांनी तर हे पुस्तक वाचाच वाचा परंतु जे. डी. पराडकरांची इतरही पुस्तके नक्की वाचा. मी तुम्हाला खातरी देतो की तुम्ही नक्कीच कोकणच्या प्रेमात पडल्याशिवाय राहणार नाही.

# जातीभेद



मयूर बागुल
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

लघुकथा





गावाचं नाव होतं सोनवाडी. हिरव्यागार डोंगरांच्या कुशीत वसलेलं, सकाळी पक्ष्यांच्या किलबिलाटाने जागं होणारं आणि संध्याकाळी मंदिरातील घंटानादाने शांत होणारं. बाहेरून पाहिलं तर हे गाव जणू एखाद्या चित्रासारखं सुंदर दिसायचं! पण त्या सौंदर्याच्या आत एक न दिसणारी रेषा होती - जातीची रेषा! त्या गावात दोन मुले वाढत होती. विठ्ठल आणि समीर. दोघंही एकाच वयाची, एकाच शाळेत शिकणारी, एकाच मैदानावर खेळणारी! पण तरीही त्यांच्या आयुष्यांमध्ये एक अदृश्य भिंत होती. विठ्ठल हा गावातील सवर्ण कुटुंबात जन्मलेला. त्याचे वडील शेतकरी होते आणि गावातील मानाचे माणूस म्हणून ओळखले जायचे. समीर मात्र गावाच्या शेवटच्या टोकाला असलेल्या वस्तीत राहायचा. त्याचे वडील मजुरी करत आणि आई गावातल्या घरांमध्ये कामाला जायची. शाळेत दोघंही एकत्र बसायचे, एकत्र हसायचे. शिक्षकांच्या नजरेत ते फक्त विद्यार्थी होते पण शाळेच्या भिंतीबाहेरचं जग वेगळं होतं.

एकदा उन्हाळ्याच्या सुट्टीत विठ्ठलने समीरला घरी बोलावलं. दोघांनी दिवसभर खेळायचं ठरवलं होतं. समीर आनंदाने तयार झाला पण जेव्हा तो विठ्ठलच्या घराच्या दाराशी पोहोचला तेव्हा त्याच्या पायांनी पुढे जायला नकार दिला. आतून विठ्ठलची आई बाहेर आली. तिच्या चेहऱ्यावर एक क्षण स्मित होतं पण लगेच ते बदललं.

''कुठून आलास?'' तिने विचारलं.

समीरने नाव सांगितलं. क्षणभर शांतता पसरली. ''विठ्ठल बाहेर खेळायला येईल,'' ती म्हणाली आणि दरवाजा हळूच बंद झाला. त्या दिवशी विठ्ठल बाहेर आला पण घरात येऊ न दिल्याचं कारण त्याला समजलं नाही. त्याच्यासाठी समीर फक्त मित्र होता. काही दिवसांनी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन होतं. शिक्षकांनी एक नाटक ठेवायचं ठरवलं समानता. त्यात मुख्य भूमिका समीरला मिळाली. तो खूप आनंदी होता. विठ्ठलनेही त्याला मदत केली.

नाटकाच्या दिवशी सगळं गाव जमलं होतं. समीर रंगमंचावर उभा राहून म्हणाला, ''माणसाला त्याच्या कर्माने ओळखलं पाहिजे, जन्माने नाही.''

प्रेक्षकांमध्ये काहींनी टाळ्या वाजवल्या पण काहींच्या चेहऱ्यावर नाराजी होती. नाटक संपलं. सगळे घरी गेले! पण दुसऱ्या दिवशी गावात कुजबूज सुरू झाली. त्या मुलाला एवढी मोठी भूमिका कशी दिली? मर्यादा पाळायला हव्यात. हळूहळू समीरच्या कुटुंबावर दबाव वाढू लागला. त्याच्या वडिलांना काम मिळणं कमी झालं. आईला काही घरांतून कामावरून काढण्यात आलं. विठ्ठलला हे सगळं समजत नव्हतं. एके दिवशी त्याने वडिलांना विचारलं, ''समीर वाईट आहे का?''

वडील थोडा वेळ शांत राहिले. ''वाईट नाही पण आपल्यासारखा नाही.''

''का?''

त्या प्रश्नाचं उत्तर त्यांच्याकडे नव्हतं! पण परंपरा होती आणि त्या परंपरेचं ओझं ते स्वतःही वाहत होते. गावात एक विहीर होती, जिथून सगळे पाणी भरायचे! पण समीरच्या वस्तीतल्या लोकांना तिथून पाणी भरायला मनाई होती. त्यांच्यासाठी वेगळी, लांबची विहीर होती. एकदा दुष्काळ पडला. ती दूरची विहीर आटली. समीरची आई गावाच्या मुख्य विहिरीकडे गेली. तिच्या हातात रिकामा घडा होता. ती पाणी भरायला वाकली, इतक्यात कुणीतरी ओरडलं, ''थांब!''

गावातले काही लोक जमा झाले. ''ही विहीर सगळ्यांसाठी नाही!''

समीर तिथेच उभा होता. त्याच्या डोळ्यांत भीती आणि अपमान दोन्ही होते. विठ्ठलही तिथे आला. त्याने आईकडे पाहिलं. मग गावकऱ्यांकडे. ''पाणी सगळ्यांसाठी असतं,'' तो म्हणाला.

क्षणभर शांतता पसरली. काहींनी त्याच्याकडे रागाने पाहिलं.

''तू लहान आहेस, तुला समजणार नाही,'' कुणीतरी म्हणालं पण त्या दिवशी विठ्ठलने स्वतः पाणी भरून समीरच्या आईच्या घड्यात ओतलं. तो छोटा क्षण होता पण मोठी रेषा हलली. काळ गेला. दोघं मोठी झाली. समीरने खूप कष्ट करून शिक्षण पूर्ण केलं आणि शहरात नोकरी मिळवली. तो अधिकारी झाला. विठ्ठलनेही शेती सांभाळत गावातच राहण्याचा निर्णय घेतला. वर्षांनंतर समीर परत गावात आला. आता तो वेगळा दिसत होता. आत्मविश्वासाने भरलेला. गावात त्याचं स्वागत झालं कारण आता तो मोठा माणूस झाला होता.

गावात नवीन पाणी प्रकल्प उभारायचा होता. समीरला त्यासाठी मदत करायला बोलावलं गेलं. त्याने गावाच्या नकाशावर बोट ठेवलं आणि म्हणाला, ''पाणी सगळ्यांना समान मिळालं पाहिजे.''

त्या वेळी कुणी विरोध केला नाही. काम सुरू झालं. नवीन जलटाकी उभी राहिली. पाणी आता प्रत्येक घरापर्यंत पोहोचणार होतं, जातीभेद न करता. उद्घाटनाच्या दिवशी समीरने भाषण केलं. ''मी इथलाच आहे. या गावाने मला शिकवलं वेदना काय असते ते! पण त्याच गावाने मला मैत्रीही दिली. त्याने विठ्ठलकडे पाहिलं. जातीभेद ही फक्त परंपरा नाही, ती मनातली भिंत आहे. ती भिंत आपणच बांधतो आणि आपणच तोडू शकतो.''

गावात शांतता पसरली. त्या दिवशी पहिल्यांदा गावातील सगळे लोक एकाच रांगेत उभे राहून पाणी भरत होते. कोणाच्या हातात घडा, कोणाच्या हातात बादली! पण आता त्या हातांमध्ये फरक नव्हता. सोनवाडी बाहेरून आधीही सुंदर होतं पण आता आतूनही ते बदलत होतं आणि त्या बदलाची सुरुवात झाली होती एका छोट्या प्रश्नाने. का?

■■

# अंगुठाछाप



भरत विठ्ठल पाटील
नाशिक
९६६५९११६५७

मज आवडते मनापासूनी शाळा

मुलांना नवे ते हवे असते हा नित्याचा अनुभव असल्याने त्यांना विचारलं, ''आज काय शिकायचं?''

एकच गलका करत नव्या फर्माईश येऊ लागल्या.

''गणित''

''मराठी''

''इंग्रजी''

''टीव्ही पाहायचा''

''काहीच नाही''

सारे पटापट ज्याला जे आवडेल ते दणादण तोंडातून येत कानावर आदळत होते, तेवढ्यात दुर्वा जोरात, ''शांत व्हा रे. आपल्या सरांचे कान दुखतील ना!''

सारा वर्ग शांत झाला. तिचे बोलणे पुन्हा सुरू झाले. ''चित्रकला घ्या सर.''

मग वर्गात चित्रकलेचा तास सुरू झाला. फळ्यावर मी मोठ्या अक्षरांत लिहिलं, ''आज काहीतरी वेगळं करूया!''

मुलांच्या डोळ्यांत कुतूहल चमकत होतं. ती एकमेकांकडे बघू लागली. नेहमीसारखं नसेल हे त्यांना समजले होते. पेन्सिल, वही, रंगीत खडू घेऊन बसण्याऐवजी आज त्यांच्या चेहऱ्यावर ''काय होणार?'' असा प्रश्न होता. मी वॉटर कलर टेबलावर ठेवले. ते पाहताच दुर्वा म्हणाली, ''सर, हाताच्या अंगठ्याला रंग लावून कागदावर उमटवू या! मग त्याला डोळे, कान काढू!''

कल्पना भन्नाट होती. वर्गात क्षणभर शांतता पसरली आणि लगेच सगळे म्हणाले, ''हो हो करूया!''

तिला म्हटलं, ''हे कुठे पाहिलं?''

''यूट्यूब''

तिलाच एखादे दुसरे चित्र काढण्यास सांगितले. तिने पटकन आपला अंगठा रंगात बुडवत पेनाची साथ घेत कागदावर पक्षी काढून दाखवला. वर्गात तिचे कौतुक केले. काही चित्र यूट्यूबवर मुलांना दाखवून स्मरणचित्र काढण्यावर भर दिला. पोरांनी आता स्वतःजवळच्या रंगांच्या डब्या उघडल्या. लाल, पिवळा, निळा, हिरवा असे रंग अंगठ्यावर लावून कागदावर उमटू लागले. सारा वर्ग रंगात न्हाऊन निघत होता. एका छोट्याशा ठिपक्यातून किती कल्पना उगम पावू शकतात, याचा प्रत्यय त्या दिवशी आला. कुणी अंगठ्याच्या ठशातून चिमणी तयार केली, कुणी उंदीर, कुणी फुलपाखरू काहींनी तर अंगठ्यांच्या रांगा लावून अळी साकारली.

त्या छोट्याशा 'अंगुठाछापा'तून सर्जनाचा मोठा दरवाजा उघडला होता.

हा उपक्रम केवळ चित्रकलेचा नव्हता; तो शिक्षणाचा जिवंत अनुभव होता. रंग हाताला लागले, कागद माखला, बोटं हलली शरीराची हालचाल झाली. शारीरिक कृतीतून शिकणं ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली. हात डोळा समन्वय, बोटांची पकड, रेषांचा ताळमेळ हे सगळं नकळत घडत होतं. रंगांच्या स्पर्शातून मुलांना संवेदना कळत होत्या. निळा रंग थंड वाटतो, लाल उठून दिसतो, हिरवा डोळ्यांना सुखावतो. रंगांच्या मानसशास्त्राची बीजं त्या खेळातच पेरली जात होती. मुले रंगमय झाली होती.

कल्पनाशक्तिला तर पंख फुटले होते. एका ठशातून पक्षी उडत होता, दुसऱ्या ठशातून ससा धावत होता. कुणी अंगठ्याच्या दोन ठशांना जोडून आई मुलाचं चित्र काढलं. एका छोट्याशा बोटाच्या ठशात त्यांनी आपली दुनिया रंगवली. या प्रक्रियेत मुलं फक्त 'चित्र काढत' नव्हती; ती विचार करत, निर्माण करत, स्वतःचा ठसा उमटवत होती. पुस्तकातील चौकटीबाहेर जाऊन त्यांनी सर्जनाचा आनंद अनुभवला.

दुर्वाच्या एका साध्या कल्पनेने संपूर्ण वर्ग हलला. मुलांच्या डोक्यातून आलेली कल्पना शिक्षकाने स्वीकारली की वर्गात शिक्षणाचा उत्सवच साजरा होतो, हे पुन्हा जाणवलं.

''सर, माह्या उंदीर बघा!''

''माझं फुलपाखरू उडतंय!''

''ना रं, हायी कसं दिखं ना डाखीनसारखं!''

मुलांच्या आवाजात आत्मविश्वास होता. स्वतःच्या हाताने काही तरी निर्माण केल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर खुलला होता.

आजही आपल्या समाजात 'अंगठाछाप' हा शब्द निरक्षरतेचं प्रतीक म्हणून वापरला जातो. सही करता येत नाही, नाव लिहिता येत नाही म्हणून माणूस केवळ अंगठ्याचा ठसा उमटवतो. आज निरक्षरता दूर करण्यासाठी उल्लास नावाचा केंद्र पुरस्कृत उपक्रम सुरू आहे. निरक्षरता ही एक वेदनादायक वस्तुस्थिती आहे पण शिक्षणाची खरी ताकद हीच की, तोच अंगठा जो केवळ ओळखीचा ठसा देत होता, तोच एक दिवस पेन पकडतो, अक्षरं रेखाटतो आणि स्वतःची सही करतो. अंगठा म्हणजे अज्ञानाची खूण नाही; तो शक्यतेचा प्रारंभबिंदू आहे. त्या दिवशी वर्गात उमटलेले रंगीत ठसे नवा संदेश मनात पेरून गेले, ही मुलं उद्या केवळ अंगठ्याचा ठसा देणारी नाहीत; ती स्वतःचं नाव लिहिणारी, विचार मांडणारी, समाजात आपली सही करणारी पिढी आहे. शिक्षण म्हणजे अंगठ्याला सहीपर्यंत नेण्याचा प्रवास. त्या प्रवासाची सुरुवात कदाचित अशाच एखाद्या छोट्याशा 'अंगुठाछापा'तून होत असते. अंगठ्याच्या ठशातून सुरू झालेला हा प्रवास अक्षर, विचार आणि आत्मविश्वासापर्यंत पोहोचतो. शाळा म्हणजे अंगठ्याला 'अंगठाछाप' न राहू देणारी संस्कारभूमीच हे शाश्वत सत्य!

अंगठ्याचा ठसा म्हणजे केवळ ओळख नाही; तो सर्जनाचा प्रारंभ आहे. त्या दिवशी प्रत्येक मुलाने कागदावर आपला 'अंगुठाछाप' उमटवला; पण खरं तर त्यांनी मनावर एक आठवण उमटवली.

शिकणं म्हणजे आनंद, रंग आणि प्रत्यक्ष कृतीचा उत्सव!

■■

# आम्ही श्रद्धाळू की अंधश्रद्धाळू?



सयाजी शिंदे
राहुरी
९४२३४६८३४७

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यावर आतापर्यंत बरेच वाचनात आले आहे. बऱ्याच जणांनी पोटतिडकीने लिहिले आहे. बऱ्याच जणांनी घशाला कोरड पडेपर्यंत व्याख्यानं दिली आहेत. विविध वाहिन्यांवर मालिकेतून, चित्रपटातून व्याख्यानातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केलेला आहे पण त्याचा किती परिणाम झाला आहे, हा चिंतेचा विषय ठरू शकतो. श्रद्धा आणि अंधश्रद्धेने पूर्वीपासून आणि आत्ता पण चांगलाच धुमाकूळ घातलेला आहे. व्यक्तिगत कुणाच्या भावनांना स्पर्श न करता व आस्तिक-नास्तिकवादाच्या भानगडीत न पडता, तटस्थपणे यावर विचार व्हायला हवाय.

श्रद्धेबाबत फारसे बोलण्याचे करण नाही. कुणाची कशावर श्रद्धा असावी हा व्यक्तिपरत्वे वेगळा विषय आहे. कुणी डोळसपणे देवाला, संताला, गुरूला श्रद्धास्थानी ठेवून आनंदी जीवन जगत असतील. कोणत्याही गरजेपोटी ती श्रद्धा नसेल किंवा काही अपेक्षा त्या श्रद्धेच्या आड लपलेल्या नसतील. कुटुंबाला, समाजमनाला क्लेशदायक ठरणारी ती श्रद्धा नसेल; पण श्रद्धेला जर अंधश्रद्धेची जोड मिळाली तर अमर्याद गरजा, अपेक्षा, स्वार्थ वाढून माणसाचं माणूसपण हरवल्याशिवाय राहत नाही. माणूस अंधश्रद्धाळू का बनतो? वैचारिक दुर्बलता, काल्पनिक संकटांची भीती, असुरक्षतेची भावना, झटपट सुखी होण्यासाठी धडपड, सूडबुद्धी, बदला, पैशाची अमर्याद हाव, सद्विचार आणि सत्संगाचा अभाव इत्यादी कारणामुळे माणूस अंधश्रद्धेकडे वळतो. समाजामध्ये अशा विकलांग विचारांच्या माणसाची काही कमतरता नाही, हे काही धूर्त माणसं ओळखतात आणि इथेच भोंदूगिरीला सुरूवात होते. इथेच ढोंगीबाबा अवतरतात. विनासायास, कष्ट न करता ते स्त्री-पुरुषांची शारीरिक, भावनिक आणि आर्थिक लयलूट करतात. फसव्या मंत्र-तंत्रांचा, देवी-देवतांचा आधार घेत ते दरोडे टाकतात.

भविष्यातील रंगीत स्वप्नं दाखवित हे बाबा दिवसा ढवळ्या माणसांना दुर्बल बनवतात. कोणत्या तरी कृतीने,कोणत्या तरी बनावट, फसव्या वस्तुने, औषधाने स्वप्नं साकार होतात हे स्वीकारलेच कसे जाते? माणूस आपली बुद्धी, वैचारिक क्षमता गुंडाळूनच बुवाबाजीकडे वळतोय असा निष्कर्ष काढणे अतिशयोक्तीचे ठरू नये. एकीकडे शास्त्र आणि तंत्रविद्येने माणूस झपाट्याने विकासाकडे धावतोय. एआयची विलक्षण प्रगती, विविध समाजमाध्यमातून मिळणाऱ्या विचारांचा स्फोट पाहता माणूस एवढा विचारशून्य आणि मानसिक दुर्बल कसा होऊ शकतो, हे एक न सुटणारं कोडं आहे. बरं अंधश्रद्धेने अडाणी, दुर्बल घटकातील स्त्री-पुरुष, दुर्गम भागातील माणसं पछाडली जातात असं नाही, तर उच्चभ्रू, सधन, सुशिक्षित माणसं पण त्या वाटेने जातात ही अतिशय दुर्दैवी व लज्जास्पद बाब आहे.

अशी माणसं अमर्याद गरजा, सत्तेची हाव, स्वार्थ, मोठेपणा यांनी झपाटलेले दिसतात आणि त्यांच्यातील विद्येने झालेले संस्कार पूर्ण कोमेजून गेलेले दिसतात. एकविसाव्या प्रगत शतकात अंधश्रद्धेला एवढं खतपाणी घातलं जातंय हे पाहून जाणकार माणसं सुन्न झाल्याशिवाय राहणार नाहीत.



## आरोपांचा स्फोट पण सत्य कुठे?

पुणे परिसरात धार्मिक व्यक्तिंवर आरोपांच्या घटना अचानक वाढू लागल्याने शहरात एक वेगळाच प्रश्न उभा राहिला आहे. खरोखर भोंदूगिरी उघड होत आहे का, की काही प्रामाणिक लोकांनाच जाणीवपूर्वक अडकवले जात आहे?

अलीकडील काही घटनांमध्ये धर्माच्या नावाखाली लोकांची फसवणूक केल्याचे प्रकार समोर आले आहेत. चमत्कार, अंधश्रद्धा आणि भावनिक प्रभाव वापरून आर्थिक फायदा घेतल्याचे आरोप काही व्यक्तिंवर सिद्धही झाले आहेत. त्यामुळे अशा प्रवृत्तीविरोधात कारवाईची मागणी तीव्र होत आहे आणि समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मात्र याच वेळी एक वेगळीच बाजूही पुढे येत आहे. स्थानिक स्तरावर काही प्रकरणांमध्ये वैयक्तिक वाद, जमीन व्यवहार, आर्थिक हितसंबंध किंवा राजकीय स्पर्धा यामुळे धार्मिक आणि समाजसेवक व्यक्तिंवर आरोप लावले जात असल्याची चर्चा आहे. काही घटनांमध्ये आरोपांची मालिका इतक्या वेगाने पसरते की चौकशी होण्याआधीच संबंधित व्यक्ती समाजाच्या नजरेत दोषी ठरते. सोशल मीडियाने या परिस्थितीत मोठी भूमिका बजावली आहे. एखादा व्हिडिओ, एखादी पोस्ट किंवा अपूर्ण माहिती काही मिनिटांत हजारो लोकांपर्यंत पोहोचते. त्यानंतर सत्य शोधण्याची गरजच अनेकांना वाटत नाही. 'जे दिसते तेच सत्य' असा समज पसरतो आणि त्याच क्षणी एखाद्याची प्रतिमा कोसळते. स्थानिक नागरिकांमध्येही याबाबत तीव्र मतभेद दिसून येत आहेत. काहींचे मत आहे की, 'अशा लोकांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे,' तर काही जण म्हणतात, 'अनेक वेळा चांगल्या माणसांनाही मुद्दाम अडकवले जाते.' या दोन टोकांच्या प्रतिक्रिया समाजातील वाढत्या अविश्वासाचे चित्र दिसत आहे. लोकांच्या मते ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरू शकते; कारण एका बाजूला भोंदूगिरीविरोधात कारवाई होणे गरजेचे असताना दुसऱ्या बाजूला निरपराध व्यक्तिंवर अन्याय होण्याची शक्यता वाढत आहे. आरोप खरे असोत किंवा खोटे, एकदा का बदनामी झाली की तिचा परिणाम दीर्घकाळ राहतो, हे वास्तव नाकारता येत नाही. प्रशासनासमोरही हे मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशा प्रकरणांची निष्पक्ष आणि जलद चौकशी करून सत्य समोर आणणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा अफवा आणि आरोपांच्या या साखळीमुळे समाजात अधिक गोंधळ आणि तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. सध्याच्या परिस्थितीत एक गोष्ट स्पष्ट दिसते, आरोपांची गती वाढली आहे पण अनेक घटनांच्या मागील सत्य अजूनही मागेच आहे आणि तोपर्यंत कोण भोंदू आणि कोण बळी? हा प्रश्न अनुत्तरितच राहणार आहे.



सचिन माथेफोड
थेऊर, पुणे
८९७५३२९७९७

## कई बार यूं भी देखा है



रमा जाधव
कोल्हापूर
८००७९९७२२३

**रजनीगंधा या चित्रपटातील 'कई बार यूं भी देखा है' हे गीत ऐकताना मन एखाद्या जुनाट वाड्यात शिरल्यासारखं होतं. दरवाजे उघडे असतात पण आत नेमकं काय आहे, याचा थांग लागत नाही. मुकेश यांचा आवाज त्या वाड्यातल्या अंधाऱ्या ओसरीवरून अलगद फिरतो आणि योगेश यांचे शब्द जणू भिंतींवर कोरलेले जुनाट शिलालेख भासतात. सलील चौधरी यांचं संगीत या साऱ्या अनुभवाला एक धूसर, स्वप्नाळू किनार देतं.**

या गीतातलं 'मन' हे सरळसोट, साधं अस्तित्व नाही; ते एखाद्या वाऱ्याने हलणाऱ्या दिव्याच्या ज्योतीसारखं आहे. क्षणभर उजळणारं आणि लगेचच अंधारात विरणारं. 'मन की सीमा रेखा' ही कल्पना जणू एखाद्या वाळवंटात आखलेली रेषा आहे; क्षणात वाऱ्याने पुसली जाणारी. मनाला सीमा असावी, असं आपण मानतो; पण ती सीमा कुठे आहे, हेच ठरवता येत नाही. म्हणूनच ते 'अन्जानी प्यास' आणि 'अन्जानी आस' यांच्या मागे धावत राहतं. जणू एखाद्या मृगजळाच्या मागे भटकणारा प्रवासी.

जीवनाच्या वाटा या गीतात केवळ प्रवास नाहीत; त्या एखाद्या गूढ अरण्यासारख्या आहेत. 'राहों में जो खिले हैं फूल' ही फुलं साधी फुलं नाहीत; ती क्षणांची, नात्यांची, आठवणींची धूसर छाया आहेत. प्रत्येक फूल आपल्याला हाक देतं पण कोणतं फूल आपल्या मनात साठवावं, हे ठरवताना मन अधिकच गोंधळून जातं कारण प्रत्येक फुलामागे एक वेगळी कथा आहे, अर्धवट, अपूर्ण आणि कधीच पूर्ण न होणारी.

'जानूँ न उलझन ये जानूँ न' या ओळींतून मनाची जी अवस्था व्यक्त होते, ती केवळ गोंधळ नाही; ती एक अस्तित्वाची छाया आहे. माणूस स्वतःलाच ओळखू शकत नाही, ही जाणीव इथे ठसठशीतपणे जाणवते. 'किसको मीत बनाऊँ, किसकी प्रीत भुलाऊँ' हा प्रश्न जणू दोन वाटांवर उभ्या असलेल्या प्रवाशाचा नाही; तो अशा माणसाचा आहे, ज्याला वाटाच सापडत नाहीत. या गीतात कुठेही ठोस उत्तरं नाहीत. उलट,




प्रत्येक ओळ एक नवीन प्रश्न निर्माण करते. कदाचित, हीच या गीताची खरी ताकद आहे कारण मनाचं स्वरूपच असं आहे. ते उत्तरांपेक्षा प्रश्नांमध्येच अधिक जगतं. 'शेवटी, हे गीत म्हणजे एखाद्या धूसर स्वप्नासारखं आहे. जागं झाल्यावर ज्याचा अर्थ लागत नाही पण त्याची भावना मात्र दीर्घकाळ मनात रेंगाळत राहते आणि कदाचित त्या न उमजणाऱ्या भावनेतच त्याचं खरं सौंदर्य दडलं आहे.

# एक पाऊल पुढे



संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०




**आयुष्यात जेव्हा कोणी पराभूत होते तेव्हा प्रथम तो पराभव स्वतःच्या आत झालेला असतो. अशावेळी बाह्य परिस्थितीत कितीही लढण्याचा प्रयत्न केला तरी आतून पराभव झाला असेल तर जिंकणे कठीण असते. अनेकदा पराभूत मानसिकतेने प्रवास केला जातो. एखादी गोष्ट मनापासून करायची नसेल तर त्यासाठी विविध कारणांचा शोध सुरू होतो आणि पुढे तीच कारणे सांगितली जातात. खरं तर त्या कारणांमुळेच आपला पराभव होत असतो. मुळात कारणांचा शोध घेण्याऐवजी प्रवास सुरूच ठेवला तर बरेच काही साध्य होण्याची शक्यता आहे. जीवनात कितीही पुढे जायचे असले तरी त्यासाठी त्या अंतराचा विचार करू नका. गरज असते फक्त एक पाऊल चालण्याची. ते एक पाऊल पुढे टाकले की, पुढचा प्रवास आपोआप सुरू होतो. त्यासंदर्भात ओशो एक गोष्ट सांगतात.**



एक शेतकरी होता. त्याला खूप दिवसांपासून राहत्या घरापासून दहा एक किलोमीटरवर असलेल्या एका गिरीपर्वतावर जाण्याची मनापासून इच्छा होती. अंतरही तसे खूप होते. डोक्यावर सूर्य आग ओकत होता मात्र त्या डोंगरावरील निसर्ग खूपच छान होता. वेली, फुलांची झाडे बहरली होती. तेथे झरे वाहत होते. भोवताल अत्यंत देखणा आणि सुंदर होता. कोणालाही मोहीत करेल असेच ते ठिकाण होते. शेतकऱ्याला जायचे होते. त्याच्या आसपासच्या गावची अनेक माणसं त्या गिरीपर्वतावर जात होती. त्या पर्वताची मोहिनी अनेकांना होत होती. त्याप्रमाणे याही शेतकऱ्याला जाण्याची मनीषा होती पण जाणे होत नव्हते. आपण जावे असे त्याला वाटत होते. प्रत्येक वेळी जायची इच्छा झाली की, उन्ह आडवे यायचे आणि रात्री जावे म्हटले तर साराच काळाकुट्ट अंधार. जाणेच कठीण होते. त्याकाळी कोणत्याही प्रकारची विद्युत पुरवठ्याची व्यवस्था नव्हती. त्यामुळे वाटेवर वीज असण्याची शक्यता नव्हती. शेतकऱ्याला मात्र गिरीपर्वतावर जायची इच्छा होती. त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचा कंदील, दिवा नव्हता. त्यामुळे रात्रीचा प्रवास करणे शक्य नव्हते. आता आपण कसे जायचे? असा त्याला प्रश्न पडायचा. दिवसा जाणे जसे होत नव्हते तसे रात्रीही जाणे होत नव्हते. मुळात खरंच शेतकऱ्याला त्या गिरीपर्वतावर जायचे होते की फक्त तो कारणे शोधत होता? पण अचानक त्याला एक कंदील मिळाला. आता आपली इच्छा पूर्ण होईल असे त्याला वाटू लागले. मनात जाण्याच्या दिशेने विचार सुरू केला होता.

एक दिवस आपण त्या गिरीपर्वतावर जाऊ असे त्याला वाटले. त्याने जाण्याचा निर्धार केला. जाण्यासाठी सर्व तयारी केली. अर्थात दिवसा जाण्याचे टाळले जात होते. रात्री त्याने कंदील पेटवला. निघण्यासाठी आता मध्यरात्र झाली होती. अवतीभोवती सर्वत्र निरव शांतता होती. त्या दिवशी अमावस्या होती. त्यामुळे आकाशात कोणत्याच प्रकारचा प्रकाश असण्याची शक्यता नव्हती. गिरीपर्वताच्या दिशेने त्याने हाती कंदील घेऊन प्रवास सुरू केला. त्या अंधाऱ्या रात्री इतरत्र कोठेही प्रकाशाचा दिवा नव्हता. अशावेळी हा शेतकरी हातात कंदील घेऊन निघाला. हातातील कंदीलाचा प्रकाश सात-दहा फूट त्याच्या प्रत्येक पावलाच्या पुढे पडत होता. खरं तर अमावस्येच्या रात्री मनात भीतीचे काहूर निर्माण झाले होते. तरी तो मनात विचार करून चालू लागला मात्र पुन्हा थांबला. आपल्याला त्या गिरीपर्वतावर जाता येणार नाही, असे त्याला वाटले. तो गिरीपर्वत त्याच्या पासून बऱ्याच अंतरावर होता. तेथेपर्यंत जाण्यासाठी प्रकाशाची वाट नव्हती. त्याच्या कंदिलाचा प्रकाशही फारसा दूरवर पडत नव्हता. त्यामुळे आपण जायला नको, असे त्याने ठरवले आणि तो जिथपर्यंत पोहोचला होता तिथेच त्याने थांबणे पसंत केले. आपल्या मनातील इच्छा आता पूर्ण होणार नाही हे आता जणू पक्के झाले होते. तो निराश झाला होता. पुन्हा काही काळ थांबला. रात्र असल्याने व घरापासून बरेच अंतर पुढे चालत आल्याने त्याने परत न जाता येथेच थांबणे पसंत केले. सकाळी सूर्य उगवला की पुन्हा घरी जाता येईल असे त्याने ठरवले. त्यासाठी काही वेळ तेथेच त्याला थांबावे लागणार होते. त्यामुळे तो शेतकरी थांबला. काही वेळ गेल्यानंतर त्याच्या मागून दुसरा एक शेतकरी आला होता. त्यालाही गिरीपर्वतावर जायचे होते. त्याच्या हाती छोटासा दिवा होता. त्याचा प्रकाश फारसा मोठा नव्हता मात्र तरी तो गिरीपर्वताच्या दिशेने निघाला होता. तो पुढे जात असताना, जेथे शेतकरी बसलेला दिसला. तेथे हा शेतकरी आपला दिवा घेऊन पोहोचला होता. त्या बसलेल्या शेतकऱ्याने त्याला विचारले की, ''तुला कोठे जायचे आहे?'' तेव्हा तो दिवा हातात घेऊन निघालेला शेतकरी म्हणाला की, ''मला गिरीपर्वतावर जायचे आहे.''

हे ऐकल्यावर कंदील घेऊन बसलेला शेतकरी हसला आणि म्हणाला, ''अरे बाबा, तुझ्या हाती हा छोटासा दिवा आहे. त्याचा प्रकाश तीन-चार फूट देखील पडत नाही, तू कसा पुढे जाणार? कारण तुला येथून ज्या गिरीपर्वतावर जायचे आहे तो गिरीपर्वत तर कितीतरी मैल अंतरावर आहे. तुझ्या हाती असलेला दिव्याचा प्रकाश फारसा पुढे पडत नाही. त्यापेक्षा माझ्या जवळ असलेल्या कंदिलाचा प्रकाश अधिक पडतो आहे पण गिरीपर्वताचे अंतर अधिक असल्याने तेथपर्यंत प्रकाश कसा पडणार?''

हा प्रश्न ऐकल्यावर तो दिवा घेऊन निघालेला शेतकरी हसला. तो म्हणाला ''अरे बाबा, तुला गिरीपर्वतावर जायचे आहे. तुझ्या हाती जो कंदिल आहे, त्याचा प्रकाश तुझ्यापुढे सात-आठ फूट पडतो आहे. अरे तुला जायचे अंतर कितीही असले, तरी तू फक्त एक पाऊल पुढे टाक. तुझ्यापुढे तुझ्या हातातील कंदिलाचा प्रकाश पाच-सात फूट पडणार आहे. तुला तर फक्त एकच पाऊल पुढे टाकायचे आहे. कंदील तुझ्या पुढे प्रकाश घेऊन चालणार आहे. तू फक्त पाऊल टाक पण आपले मन पुढे पडत नसेल तर आपला प्रवास कधीच पुढच्या दिशेने घडणार नाही.''

जीवनातही पुढे जायचे असेल तर फक्त एक पाऊल पुढे टाकण्याची गरज आहे मात्र ते पाऊल टाकण्याऐवजी आपण मनातच नकारात्मक विचार करू लागलो तर तेच पाऊल पुढे पडत नाही. म्हणून जीवनात प्रगतीची वाट सापडत नाही. पुढचा अंधार नष्ट करायचा असेल तर हाती असलेला दिवा कितीही छोटासा प्रकाश देवो, तुम्हाला तो दिवा जीवनाचे ध्येय निश्चित साध्य करण्यास मदत करेल यात शंका नाही.

# ज्योतिरादित्य शिंदे यांना महाराजा यशवंतराव होळकर राष्ट्रगौरव पुरस्कार

**दिल्ली :** महाराजा यशवंतराव होळकर यांच्या २५० व्या जयंती वर्षानिमित्त विशेष 'महाराजा यशवंतराव होळकर राष्ट्रगौरव पुरस्कार' भारत सरकारचे केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य माधवराव शिंदे यांना प्रदान करण्यात येणार आहे. सरहद संस्थेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान केला जाणार आहे.

या पुरस्कारासाठीची निवड डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने एकमताने केली असून समितीत महाराजा यशवंतराव होळकर गौरव प्रतिष्ठानचे संजय सोनवणी, प्रकाश खाडे यांचा समावेश होता. समितीने हा निर्णय घेताना शिंदे घराण्याने होळकर घराण्याच्या खांद्याला खांदा लावून मराठेशाहीचा उत्तरेत विस्तार करण्यात बजावलेल्या मोलाच्या कामगिरीचा सन्मान यांचा विचार केला आहे. मराठा इतिहासात शिंदे आणि होळकर ही दोन घराणी अनेक निर्णायक प्रसंगी परस्पर सहकार्य, सामूहिक युद्धकौशल्य आणि राष्ट्रदृष्टिकोनाची प्रतीके होती. इतिहासात राणोजी शिंदे आणि मल्हारराव होळकर यांनी दिल्लीतील मराठा प्रभाव दृढ करण्यासाठी एकत्रित भूमिका बजावली; पुढे महादजी शिंदे यांनी मराठा मुत्सद्देगिरीला सर्वोच्च शिखरावर नेले; तर पानिपतपूर्व आणि पानिपतनंतरच्या अनेक लढायांत शिंदे-होळकर सहकार्याचे अनेक संदर्भ आढळतात. काही बखरींमुळे आणि नंतरच्या किरकोळ संघर्षांमुळे



निर्माण झालेल्या गैरसमजांपलीकडे जाऊन या दोन घराण्यांच्या व्यापक ऐतिहासिक योगदानाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे. छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंती वर्षात दिल्लीत सरहद संस्था आयोजित, महाराष्ट्र सदन-दिल्ली आणि मराठी भाषा विभाग-महाराष्ट्र शासन यांच्या वतीने आयोजित केलेल्या पहिल्या महिला प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ रोजी महाराजा यशवंतराव होळकर यांच्या स्वातंत्र्यनिष्ठ परंपरेचा आणि शिंदे घराण्याच्या ऐतिहासिक राष्ट्रकार्यातील योगदानाचा सन्मान एकाच व्यासपीठावर होणे, हा राष्ट्रीय ऐक्याचा महत्त्वपूर्ण क्षण ठरणार आहे. ज्योतिरादित्य शिंदे यांनी लोकसभा सदस्य, संसदीय कार्यातील सक्रिय सहभाग, विविध केंद्रीय जबाबदाऱ्या आणि सध्या भारत सरकारचे केंद्रीय मंत्री म्हणून सार्वजनिक जीवनात सातत्य, शिस्त आणि कार्यक्षमतेची छाप निर्माण केली आहे. परंपरेचा अभिमान आणि आधुनिक राष्ट्रकार्यातील सक्रिय सहभाग यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येत असल्याचे समितीने म्हटले आहे.

पुरस्कार वितरण समारंभ दिल्ली येथे महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार असल्याची माहिती सरहद संस्थेचे समन्वयक लेशपाल जवळगे यांनी दिली.